

देगलूर : देगलूर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. विश्वाधार देशमुख. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

# तंत्रज्ञानाच्या युगात नात्यांतील वाढता विसंवाद चिंताजनक : प्रा.डॉ. विश्वाधार देशमुख

देगलूर : माहिती तंत्रज्ञानाच्या युगात एकीकडे जग जवळ येत असले तरी माणसामाणसातील विसंवाद वाढत चालला असून नात्यात दुरावा येत आहे, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. विश्वाधार देशमुख यांनी व्यक्त केले.

देगलूर महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. प्रमुख पाहुणे आमदार जितेश अंतापूरकर, अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार, देवेंद्र मोतेवार, रवींद्रअप्पा द्याडे, विजय उनग्रतवार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, अनिल पाटील, प्रशांत दासरवार, अशोक साखरे यांची उपस्थिती होती. प्रा. गौतम भालेकर, प्रकाश सोनकांबळे यानी स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय पाटील यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी केला. यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. व्ही.जी. शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी, संतोष पाटील, बालाजी पाटील, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ राजेश्वर दुडूकनाळे, तर आभार उपप्राचार्य एम.एम. चामकुडे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner